**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात**

महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१९
कारागृह विभागातील कारागृह शिपाई भरती सन २०१९
पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे कार्यालय .

जाहिरात क्रमांक ठिकाण दिनांक

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक १८/०१/२०१९ व दिनांक ४/७/२०१९ च्या आदेशांन्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी २१४ पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

१) पोलीस शिपाई

| | अ.जा | अ.ज | वि.ज.अ | भ.ज.ब | भ.ज.क. | भ.ज.ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्युएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | १८ | ८५ | ० | २ | ० | ० | १ | २५ | २८ | २१ | ३४ | २१४ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | २५ | - | १ | - | - | १ | ७ | १० | ७ | ९ | ६५ |
| मंहिला | ५ | २६ | - | १ | - | - | - | ८ | ८ | ६ | १० | ६४ |
| खेळाडू | १ | ४ | - | - | - | - | - | १ | १ | १ | २ | १० |
| प्रकल्पग्रस्त | १ | ४ | - | - | - | - | - | १ | १ | १ | २ | १० |
| भुकंपग्रस्त | - | २ | - | - | - | - | - | १ | १ | - | १ | ५ |
| माजी सैनिक | ३ | १३ | - | - | - | - | - | ४ | ४ | ३ | ५ | ३२ |
| अंशकालीन पदवीधर | १ | ४ | - | - | - | - | - | १ | १ | १ | २ | १० |
| पोलीस पाल्य | १ | ३ | - | - | - | - | - | १ | १ | १ | १ | ८ |
| गृहरक्षक दल | १ | ४ | - | - | - | - | - | १ | १ | १ | २ | १० |
| अनाथ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | ० | ० |
| एकूण | १८ | ८५ | ० | २ | ० | ० | १ | २५ | २८ | २१ | ३४ | २१४ |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणा-या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणा-या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवु नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर संलग्न याचिकामध्ये दिनांक २७/६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होवू शकतो. व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

ड) या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकातील पदे भरतीसाठी उपलब्ध नाहीत.

३ ) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासाठी पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणंसह.(शा.नि.क्र.जेएलई.-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/तुरुंग-१ दि. १५/०१/२०१६ अन्वये) लागू आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर ( Home Page ) वर व www.punepolice.gov.in, वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.

महत्वाची टिप:-

पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणात्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टीकरप्शन ब्युरो,पुणे यांना दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२१३४ व ०२०-२६१२१४०३ वर त्वरीत संपर्क साधुन तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्त पुणे शहर या कर्यालयातील वरिष्ठ अधिका-यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०१९ तथा अपर पोलीस आयुक्त,प्रशासन/पोलीस उप आयुक्त,मुख्यालय,पुणे शहर ०२०-२६२०८२८३

यांच्याशी संपर्क साधुन तक्रार करु शकतील. तसेच, अपर पोलीस महासंचालक ,प्रशिक्षण व खास़ पथके , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संर्पक साधावा

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दुरध्वनी/ क्रमांक |
|---|---|---|
| १. | पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालय.<br>दुरध्वनी कमांक(कार्यालयीन वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी १७.४५ ) | ०२०-२६१२२८८०/<br>०२०-२६२०८३५६ |

( डॉ.संजय शिंदे )
अपर पोलीस आयुक्त, प्रशासन,
पुणे शहर.